**औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या शनिवार दि. २९. ४. ८९ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या ३७ व्या सभेचा कार्यवृत्तांत.**

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वर भोसीकर | सभापती/औरंगाबाद मंडळ |
| २] श्री. उ. म. महाजन | उपसभापती/औरंगाबाद मंडळ |
| ३] श्री. मुन्शीलाल गौतम<br>आयुक्त, महानगरपालिका<br>औरंगाबाद. | सदस्य |

विषय क्रं. १:- मंडळाच्या दिनांक ३१. ३. १९८९ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्रं. १६३

मंडळाच्या दिनांक ३१. ३. १९८९ रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांस मान्यता देण्यांत आली व तो कायम करण्यांत आला.

विषय क्रं. २:- गृहनिर्माण मंडळाने १९८८-८९ वर्षामध्ये साध्य केलेली उद्दिष्टे आणि १९८९-९० चा कार्यक्रम.

सदर विषयावरील चर्चेत भाग घेतांना सभापती यांनी अशी विचारणा केली की, गेल्यावर्षी पेक्षा या वर्षीचे उद्दिष्ट कमी का आहे ? यावर उपसभापती यांनी खुलासा केला की, उपलब्ध जमिनी लक्षात घेऊन योजना आखण्यांत आल्या आहेत. ज्यादा जमिनी मिळाल्यास उद्दिष्ट वाढविता येईल. त्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत.

ठराव क्रं. १६४

वरील विषयावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, १९८९-९० या वर्षाचे उद्दिष्ट व साध्य वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यांत यावे व आस्थापना खर्चाचे प्रमाण योग्य ते राखण्यासाठी आवश्यक तेवढा कार्यक्रम आखला जावा.

....२...

विषय क्रं. ३:- औरंगाबाद मंडळाच्या एन-६ सिडको, औरंगाबाद हया विकसित वसाहतीतील सुविधा भूखंडाचे वाटप करण्याबाबत.

ठराव क्रं. १६५

या बाब टिप्पणीवर विचार करुन मंडळाने असा निर्णय घेतला की, मंडळाच्या एन-५, भाग-१ सिडको वसाहतीमध्ये दैनंदिन सोयी करिता [११०.०० चौ. मी.] क्षेत्रफळाचा भूखंड हा दवाखान्यासाठी (Dispensary) घावा.

विषय क्रं. ४:- कंधार व लोहा या नांदेड जिल्हयातील "क" वर्ग नगरपरिषदेच्या गांवी पुनर्वसनासाठी गाळे बांधणे.

या विषयावरील चर्चेत भाग घेतांना उपसभापती यांनी सदरबाबत झालेला पत्रव्यवहार व मा. गृहनिर्माण मंत्री यांच्याशी झालेल्या चर्चेची माहिती दिली.

ठराव क्रं. १६६

या विषयावर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, कंधार व लोहा हया "क" वर्ग नगरपरिषदेच्या ठिकाणी प्रत्येकी १०० घरांची योजना आखण्यांत यावी व गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी नगर परिषदेने जमिन उपलब्ध करुन घावी यासाठी मंडळाने पत्र पाठवावे. मा. मंत्रीमहोदयांनी दिलेल्या सूचनाबाबत प्राधिकरणाकडून आदेश मागवावेत.

विषय क्रं. ५:- मंडळाच्या कर्मचा-यांना सेवानिवासस्थानाचे वाटप करणे.

ठराव क्रं. १६७

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, बाब टिप्पणीत नमुद केलेले गाळे सेवानिवासस्थान म्हणून ठेवण्यांत यावे व सदर गाळे मुख्याधिकारी हे प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कर्मचा-यांना वाटप करतील.

विषय क्रं. ६:- मुसावळ येथील गृहनिर्माण योजना.

ठराव क्रं. १६८

वरील बाब टिप्पणीवर विचार होऊन खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत आला की, सन १९७८ मध्ये ज्या लोकांनी अनामत रक्कमेसह विविध उत्पन्न गटाकरिता विहित नमुन्यात अर्ज करुन नगरपरिषदेकडे नावे नोंदविली आहे. त्यांच्यासाठी वर्तमानपत्रात घराच्या तपशीलासह जाहिरात देऊन पक्की मागणी नोंदवावी ते जर मंडळाच्या निकषानुसार पात्र अर्जदार ठरत नसतील तर अन्य लोकांना संधी द्यावी.

मा. सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय

१] बीड येथील नगरपरिषदेकडून आलेल्या गलिच्छवस्ती सुधारणा योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाबत.

ठराव क्रं. १६९

. या विषयावर चर्चा होऊन असे ठरले की, बीड नगरपरिषदेने पाठविलेल्या प्रस्तावापैकी खासबाग व मोमीनपूरा या गलिच्छ वस्त्यांच्या अनुक्रमे रु. ७.२६ व रु. ७.०१ लक्ष खर्चाच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यांत यावी. नगरपरिषदेच्या हाती असलेल्या रु.७.७१ लक्ष खर्चाची कामे प्राधान्य
∠प्रतिपूर्ती उपलब्ध आर्थिक तरतुदीच्या मर्यादेत करावी या अटीवर सदर मान्यता देण्यांत यावी.

∠ देऊन पूर्ण
करावी व मंडळाने नविन योजना वरील खर्चाची

२] वाळूज विशेष नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रामध्ये "ना हरकत प्रमाणपत्र" देण्याबाबत.

ठराव क्रं. १७०

या विषयावर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, श्री. आर. पी. सावे यांना मौजे वाळूज सर्व्हे क्रं. २६१ मधील ३.५ एकर जमिनीवर लघुउद्योग उभारण्यासाठी त्यांनी "ना हरकत प्रमाणपत्र" त्यांची नायगांव येथील सर्व्हे क्रं. ५० मधील ३.५ एकर जमिन गृहनिर्माण योजनेसाठी प्राधिकरणास देण्याची तयारी दर्शवून मागितले आहे. सदर

जमिन घेऊन विशेष नियोजन प्राधिकरण वाळूज क्षेत्राच्या अंतर्गत " ना हरकत प्रमाणपत्र देण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव प्राधिकरणाकडे विचारास्तव पाठवावा.

३] सहयोगनगर नांदेड येथील मंडळाच्या मोकळया जागेवर तारकुंपन घालणे बाबत.

मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, नांदेड येथील गृहनिर्माण मंडळाच्या सहयोगनगर वसाहतीमधील मोकळया जागेवर अतिक्रमण होत आहे. त्यासंबंधी मंडळाने योग्य ती कार्यवाही करावी.

ठराव क्रं. १७१

यावर असा निर्णय घेण्यांत आला की, नांदेड येथील मंडळाच्या जमिनीवर तारकुंपन घालून मंडळाच्या मालकीची जमिन असल्याबाबत बोर्ड लावावे. तसेच अन्यत्रही कोठे मोकळया जमिनी असल्यास तारकुंपन घालणे, फलक लावणे इत्यादी उपाय योजनेद्वारे अतिक्रमणे होणार नाहीत याची काळजी घ्यावी.